विशेष पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ

दिनांक 21/11/2022

## देशी कट्टा बाळगणा-या आरोपीस अटक स्थानिक गुन्हे शाखाची धडक कारवाई

यवतमाळ जिल्हातील अवैध शस्त्र अग्नीशस्त्र वापरुन घडणा-या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी तसेच जिल्ह्यात कोठेही अवैध शस्त्र, अग्नीशस्त्रांचा वापर होवुन नये याकरीता मा. पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी गांभीर्यपुर्वक दखल घेवुन अवैधशस्त्र बाळगणा-यां गुन्हगारांची गोपनिय माहिती काढण्याबाबत पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केल्याने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील पथकांना अवैध शस्त्रासंबधी कारवाई करण्याचे निर्देश दिले असतांना दिनांक 20/11/2022 रोजी स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ येथील अधिकारी व अमलदारांचे पथक यवतमाळ शहरात पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन खात्रीलायक बातमी मिळाली कि, ईसम नामे उमेश भिमराव म्हातारमारे वय- 30 वर्षे, व्यवसाय- सिव्हील इंजिनीअर रा. धर्माजी नगर, मोठे वडगाव ता. जि. यवतमाळ हा देशी बनावटीचे अग्निशस्त्र अवैधरित्या बाळगुन असुन त्याने सदर अग्निशस्त्र त्याचे मालकीच्या चारचाकी वाहनात लपवुन ठेवलेले आहे.

वरील प्रमाणे प्राप्त गोपनिंय माहीती वरुन स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ येथील अधिकारी व अमलदाराचे पथक ईसम नामे उमेश भिमराव म्हातारमारे वय- 30 वर्षे, व्यवसाय- सिव्हील इंजिनीअर रा. धर्माजी नगर, मोठे वडगाव ता. जि. यवतमाळ याचे घराचे पत्तावर पोहचुन त्यास ताब्यात घेवुन त्याचे घरा जवळ उभी असलेली उमेश म्हातारमारे याच्या मालकीचे वाहन क्र. MH 43 L 0231 लाल रंगाचे Santro ची पंचासमक्ष पाहणी केली असता वाहनाच्या मागील डिक्की मध्ये- एक लोखंडी बनावटीचा देशी कट्टा (अग्निशस्त्र) अवैधरित्या मिळुन आला असुन सदरचा देशी कट्टा व वाहन असा एकुण – 1,75,000/- रुपयाचा मुद्देमाल मोक्यावर पुराव्याकामी जप्त करण्यात आला असुन पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथे अपराध क्र. 1141/2022 कलम- 3, 25 आर्म अँक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, यांचे मार्गदर्शनात श्री. प्रदीप परदेशी पो.नि. स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, स.पो.नि. अमोल मुडे, स.पो.नि. विवेक देशमुख, पो.ना. विनोद राठोड, पो.ना. निलेश राठोड, पो.कॉ. रजनिकांत मडावी, चा.पो.ना. निखील मडसे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

21.11.22

( प्रदीप परदेशी )
पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ